


# पारनेर दर्शन





वर्ष ४ अंक २७, शुक्रवार १३ मार्च २०२६ ■ संपादक : देविदास आबूज ■ कार्यकारी संपादक : विजय वाघमारे RNI No.MAHMAR/2015/61493 किंमत : ३ रुपये

## खतांच्या साठेबाजीवर लगाम घाला

**शेतकऱ्यांना रास्त दरात खतांचा पुरवठा करा | आमदार काशिनाथ दाते यांनी विधानसभेत उपस्थित केला महत्त्वाचा प्रश्न | अनियमित विक्रीवर कठोर कारवाईची मागणी**

मुंबई : प्रतिनिधी

अहिल्यानगर जिल्ह्यातील शेतकऱ्यांना शेतीसाठी आवश्यक असलेली बियाणे, खते, कीटकनाशके आणि कृषी साधने रास्त दरात उपलब्ध व्हावीत तसेच खतांची साठेबाजी आणि काळाबाजार रोखण्यासाठी शासनाने कठोर पावले उचलावीत, अशी ठाम मागणी आमदार काशिनाथ दाते यांनी विधानसभेत केली. खत विक्रीत होत असलेल्या अनियमितता आणि लिंकींगच्या प्रकारांमुळे शेतकऱ्यांना मोठा त्रास सहन करावा लागत असल्याचा मुद्दाही त्यांनी सभागृहात मांडत शासनाचे लक्ष वेधले.




### शेतकऱ्यांच्या अडचणी सभागृहात

अहिल्यानगर जिल्ह्यातील शेतकऱ्यांना शेती उत्पादन वाढवण्यासाठी आणि पीक व्यवस्थापनासाठी आवश्यक साधनसामग्री वेळेत व योग्य दरात उपलब्ध होणे अत्यंत आवश्यक आहे. यामध्ये सुधारित बियाणे, खते, कीटकनाशके, सिंचन सुविधा, कृषी यंत्रे (ट्रॅक्टर, अवजारे) तसेच ऊर्जा (वीज व डिझेल) यांचा समावेश होतो. या सर्व घटकांमुळे शेतीची उत्पादकता वाढण्यास मोठी मदत होते. मात्र खत विक्रीत काही ठिकाणी अनियमितता आढळून आल्याने शेतकऱ्यांना अडचणींचा सामना करावा लागत असल्याची बाब आमदार दाते यांनी सभागृहाच्या निदर्शनास आणून दिली. काही कृषी सेवा केंद्रांवर कारवाई करण्यात आल्याचा उल्लेख करत रब्बी हंगामात शेतकऱ्यांना खतांचा पुरवठा वेळेत व योग्य दरात मिळावा यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली आहे, असा सवाल त्यांनी उपस्थित केला.

### जिल्ह्यासाठी २.६६ लाख मे. टन खतांचा कोटा

या प्रश्नावर उत्तर देताना कृषी विभागाच्या वतीने मंत्री दत्तामामा भरणे यांनी सांगितले की, सन २०२५२६ या वर्षासाठी अहिल्यानगर जिल्ह्यासाठी २ लाख ६६ हजार मेट्रिक टन खतांचा कोटा मंजूर करण्यात आला आहे. मागणीनुसार खतांचा पुरवठा करण्यात येत असून जिल्ह्यात खतांचा नियमित पुरवठा राहावा यासाठी प्रशासनाकडून सातत्याने देखरेख केली जात आहे.

### २४ कृषी सेवा केंद्रांवर कारवाई

अहिल्यानगर जिल्ह्यात सध्या सुमारे ३ हजार २८८ खत परवानाधारक विक्रेते कार्यरत आहेत. तालुकास्तरीय गुणवत्ता नियंत्रण निरीक्षक तसेच भरारी पथकांमार्फत विक्रेते व उत्पादकांची नियमित तपासणी करण्यात येत आहे. जानेवारी अखेरपर्यंत झालेल्या तपासणीत अनियमितता आढळलेल्या २४ कृषी सेवा केंद्रांवर खत नियंत्रण आदेश १९८५ चे उल्लंघन केल्याप्रकरणी कारवाई करत त्यांचे परवाने निलंबित करण्यात आल्याची माहिती मंत्री भरणे यांनी दिली.

### खतांचे 'लिंकींग' थांबवण्यासाठी सूचना

खतांची विक्री करताना लिंकींगची पद्धत वापरली जाऊ नये यासाठी जिल्हाधिकाऱ्यांनी विक्रेते आणि कंपनी प्रतिनिधींच्या बैठका घेऊन स्पष्ट सूचना दिल्या आहेत. प्रत्येक कृषी सेवा केंद्रावर उपलब्ध खतांचा साठा व दर याबाबत माहिती फलक लावण्याचे निर्देशही देण्यात आले असल्याचे मंत्री भरणे यांनी सांगितले.

### शेतकऱ्यांना दिलासा देण्याची मागणी

शेतकऱ्यांना खतांसाठी अतिरिक्त पैसे मोजावे लागू नयेत. योग्य दरात बियाणे, खते, कीटकनाशके, सिंचन सुविधा तसेच कृषी यंत्रे व अवजारे उपलब्ध व्हावीत. खत विक्रीतील अनियमिततेवर प्रभावी अंमलबजावणी करून काळाबाजार करणाऱ्यांवर कठोर कारवाई करावी आणि शेतकऱ्यांना योग्य दरात खतांचा पुरवठा करावा, अशी मागणी आमदार काशिनाथ दाते यांनी सभागृहात केली.

## विद्यार्थिनीवरील अत्याचार प्रकरणी दोघांना अटक

**| न्यायालयाने दिली पोलिस कोठडी | पारनेर पोलिसांची कारवाई | विनयभंग प्रकरणातील इतर पाच आरोपी फरार**





कान्हूरपठार : प्रतिनिधी

तालुक्यातील कान्हूरपठार परिसरात दहावीच्या अल्पवयीन विद्यार्थिनीवर अत्याचार तसेच तिच्याच सातवीत शिकणाऱ्या बहिणीचा विनयभंग केल्याच्या गंभीर प्रकरणात पारनेर पोलिसांनी दोन आरोपींना अटक केली आहे. प्रसाद संदीप साळवे आणि अनिल ऊर्फ गुंड्या किशोर साळवे अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे असून न्यायालयाने त्यांना सोमवार (दि. १६ मार्च) पर्यंत पोलिस कोठडी सुनावली आहे. या घटनेमुळे तालुक्यात संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे.

### गुन्हा दाखल होताच पोलिसांची कारवाई

अल्पवयीन मुलींवरील अत्याचार व विनयभंगाच्या घटनेप्रकरणी पारनेर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. गुन्हा नोंद होताच पोलिसांनी तातडीने तपास सुरू करत मुख्य आरोपी प्रसाद साळवे व त्याचा मित्र अनिल ऊर्फ गुंड्या साळवे यांना अटक केली. अटकेनंतर दोघांना न्यायालयासमोर हजर करण्यात आले. सुनावणीनंतर न्यायालयाने पुढील तपासासाठी दोघांनाही सोमवारपर्यंत पोलिस कोठडी दिली.

### पाच आरोपी फरार; पोलिसांचा शोध सुरू

दरम्यान, अल्पवयीन मुलीचा विनयभंग केल्याच्या आरोपाखाली गुन्हा दाखल झालेले विशाल अनिल हुलावळे, प्रथमेश शंकर लोंढे, वैभव पोपट लोंढे, शुभम आल्हाट आणि रोहित संजय चत्तर (सर्व रा. कान्हूरपठार) हे आरोपी मात्र पोलिसांच्या कारवाईची माहिती मिळताच फरार झाले आहेत. या सर्वांचा शोध घेण्यासाठी पोलिसांनी पथके तयार केली असून त्यांचा शोध सुरू असल्याची माहिती पोलिस सूत्रांनी दिली.

### परिसरात संतापाचे वातावरण

अल्पवयीन मुलींवरील अत्याचार व विनयभंगाच्या या घटनेमुळे कान्हूरपठार व परिसरात संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. फरार आरोपींना लवकरात लवकर अटक करून कठोर कारवाई करावी, अशी मागणी ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे. दरम्यान, पारनेर पोलिसांकडून या प्रकरणाचा पुढील तपास सुरू आहे.

### जयश्री ठुबे - घावटे यांचा पाठपुरावा

गेल्या आठ महिन्यांपासून विद्यार्थिनींवरील अन्याय आणि अत्याचाराविरोधात राष्ट्रीय महिला सुरक्षा समितीच्या जयश्री ठुबे-घावटे या संघर्ष करत आहेत. या प्रकरणातही दोन्ही बहिणींवर झालेल्या अत्याचार आणि विनयभंगाबाबत गुन्हा दाखल व्हावा यासाठी त्यांनी पोलिस अधीक्षक कार्यालयाशी सातत्याने पाठपुरावा केला. त्यांच्या पाठपुराव्यानंतर उपविभागीय पोलिस अधिकारी शिरीष वमने यांनी पारनेर येथे येऊन संबंधित पीडितांच्या पालकांची फिर्याद नोंदवून घेण्याची प्रक्रिया पूर्ण केली. या प्रकरणात काही राजकीय व्यक्तींनी दबाव आणल्याचा गंभीर आरोपही ठुबे-घावटे यांनी केला आहे.

## मुंबई टार्गेटवर ?

**| चार ठिकाणांना मिसाईल-बॉम्बची धमकी | विधानभवन, मेट्रो, शेअर बाजार उडवण्याची धमकी | यंत्रणा हायअलर्टवर**



मुंबई : प्रतिनिधी

राज्याच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनादरम्यान मुंबईतील सुरक्षाव्यवस्थेला मोठा धक्का देणारी घटना घडली. अज्ञात व्यक्तीकडून आलेल्या एका ई-मेलमध्ये महाराष्ट्र विधानभवन उडवून देण्याची धमकी देण्यात आल्याने सकाळी एकच खळबळ उडाली. हा मेल मिळताच पोलिसांनी तातडीने कारवाई करत संपूर्ण परिसरात सर्च ऑपरेशन सुरू केले.

सुरक्षेच्या दृष्टीने सुरुवातीला विधानभवनातील कर्मचाऱ्यांना प्रवेशद्वारावरच थांबवण्यात आले. त्यानंतर ओळखपत्र तपासणी आणि सुरक्षा पडताळणीनंतर कर्मचाऱ्यांना टप्प्याटप्प्याने आत सोडण्यात आले.

या घटनेबाबत विधानपरिषदेचे सभापती प्रा.राम शिंदे यांनी माहिती दिली. त्यांनी सांगितले की, सकाळी सुमारे ६ वाजून ५७ मिनिटांनी सीपीएच्या अधिकृत मेलवर धमकीचा संदेश प्राप्त झाला. त्या मेलमध्ये अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरू असताना बॉम्ब आणि मिसाईलद्वारे हल्ला करण्याचा


उर्वरीत पान ३ वर

## अभिषेक कळमकरांना दिलासा नाही

**अटकपूर्व जामीन अर्ज फेटाळला**

नगर : प्रतिनिधी

**तरुणीला नोकरी लावण्याचे आमिष दाखवून अत्याचार केल्याच्या आरोपाखाली गुन्हा दाखल झालेल्या माजी महापौर अभिषेक कळमकर यांचा अटकपूर्व जामीन अर्ज जिल्हा न्यायालयाने फेटाळून लावला आहे. जिल्हा व सत्र न्यायाधीश डॉ. यु. जे. मोरे यांनी १२ फेब्रुवारी रोजी हा निर्णय देत आरोपीला कोणताही दिलासा दिला नाही.**



या प्रकरणात शिरूर (जि. पुणे) येथील २५ वर्षीय विवाहित महिलेने २१ फेब्रुवारी रोजी पहाटे एमआयडीसी पोलिस ठाण्यात फिर्याद दिल्यानंतर हा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तक्रारीनंतरपासून अभिषेक कळमकर फरार असल्याचे पोलिसांनी सांगितले आहे.

फिर्यादी महिलेच्या तक्रारीनुसार, ती खासगी कामानिमित्त अहिल्यानगर येथे आली असताना सोशल मीडियाच्या माध्यमातून अभिषेक कळमकर यांचा मोबाईल क्रमांक मिळाला. नोकरीसंदर्भात संपर्क साधल्यानंतर कळमकर यांनी नोकरी मिळवून देण्याचे आश्वासन दिले होते.

काही दिवसांनी त्यांनी एमआयडीसी परिसरात आपली शाळा असल्याचे सांगत ती शाळा दाखविण्याच्या बहाण्याने संबंधित महिलेला बोलावले, असे फिर्यादीत नमूद आहे.

फिर्यादीत पुढे म्हटले आहे की, कळमकर यांनी तिला काळ्या रंगाच्या वाहनात बसवून एमआयडीसी परिसरात नेले. वाहनात असताना तिला शीतपेय दिल्यानंतर गुंगी आल्यासारखे झाले.

उर्वरीत पान ३ वर


## पुणे-नगर महामार्गावर देशातील सर्वात लांब उड्डाणपूल उभारणार

**केंद्राकडून पुण्यातील वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी तब्बल ४५ हजार कोटींच्या रस्तेप्रकल्पांना मंजुरी | पुणे-शिरूर प्रवास अवघ्या ४५ मिनिटांत**

पुणे : प्रतिनिधी

शहरातील वाढत्या वाहतूककोंडीवर दीर्घकालीन उपाय म्हणून केंद्र सरकारने पुण्यासाठी तब्बल ४५ हजार कोटी रुपयांचे विविध रस्ते प्रकल्प मंजूर केले असून त्यामध्ये पुणेनगर महामार्गावर देशातील सर्वात लांब उड्डाणपूल उभारण्याची महत्त्वाकांक्षी योजना समाविष्ट आहे. केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी ही माहिती दिली. पुण्यात सुरू असलेले काही प्रकल्प पूर्णत्वास नेण्याबरोबरच चार महत्त्वाच्या नव्या रस्ते प्रकल्पांची लवकरच सुरुवात केली जाणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

उर्वरीत पान ३ वर




## गॅसचा तुटवडा होणार नाही

**उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे स्पष्टीकरण | पंतप्रधान मोदींचे परिस्थितीवर बारकाईने लक्ष | अफवांवर विश्वास न ठेवण्याचे आवाहन**

मुंबई : प्रतिनिधी

**अमेरिका, इस्त्राईल आणि इराण यांच्यातील तणावाचे परिणाम जगभर जाणवू लागले असून त्याचे पडसाद भारतातही उमटताना दिसत आहेत. या पार्श्वभूमीवर गॅस पुरवठ्याबाबत काही अफवा पसरत असल्याने नागरिकांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे. मात्र देशात गॅसचा कोणताही तुटवडा होणार नाही, अशी स्पष्ट माहिती राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली आहे.**

गॅस व इंधन पुरवठ्याबाबत केंद्र सरकार अत्यंत बारकाईने लक्ष ठेवून आहे. देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी स्वतः या परिस्थितीवर लक्ष ठेवून असून नागरिकांनी कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये, असे आवाहन शिंदे यांनी पत्रकारांशी बोलताना केले.



सध्या व्यावसायिक गॅस सिलेंडरचे वितरण तात्पुरते स्थगित करण्यात आले असले तरी घरगुती गॅसचा पुरवठा सुरळीत सुरू असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. ग्रामीण भागात ४५ दिवसांनी आणि शहरी भागात २५ दिवसांनी नियमित गॅस पुरवठा केला जाणार आहे.

दरम्यान, गॅस सिलेंडरचा काळाबाजार रोखण्यासाठी विविध जिल्ह्यांतील

उर्वरीत पान ३ वर

### शिलाँग जहाज मुंबईत दाखल

इराण-अमेरिका तणावाच्या पार्श्वभूमीवर हार्मुज सामुद्रधुनी पार करून 'शिलाँग' हे जहाज मुंबई किनाऱ्यावर दाखल झाले आहे. युद्धसदृश परिस्थितीत कच्चे तेल घेऊन येणारे हे पहिले जहाज असल्याची माहिती मिळाली आहे. या जहाजातून सुमारे १ लाख ३५ हजार मेट्रिक टन कच्चे तेल आणण्यात आले असून ते माहुल येथील रिफायनरीकडे पाठवले जाणार आहे.

## अजितदादांची आठवण, सुंदर अक्षरांत भावना

**धोत्र्याच्या विराजची सुनेत्रा पवारांशी भेट**

मुंबई : प्रतिनिधी

पारनेर तालुक्यातील धोत्रे खुर्द येथील जिल्हा परिषद शाळेत शिकणाऱ्या एका चिमुकल्याने आपल्या सुंदर हस्ताक्षरातून भावना व्यक्त करत सर्वांचे लक्ष वेधले आहे. चौथीत शिकणारा विद्यार्थी विराज सुभाष सासवडे याची भेट कधीकाळी दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याशी होणार होती; मात्र ती भेट अधुरीच राहिली. तरीही त्या आठवणींना जपणारा विराज आज मुंबईत जाऊन राष्ट्रवादी काँग्रेसच्या राष्ट्रीय अध्यक्षा व उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांची भेट घेतली आणि आपल्या हस्ताक्षरातून भावना व्यक्त केल्या.



### सुंदर हस्ताक्षराची ओळख

धोत्रे खुर्द येथील जिल्हा परिषद शाळेत इयत्ता चौथीत शिकणारा विराज सासवडे आपल्या आकर्षक व सुबक हस्ताक्षरासाठी ओळखला जातो. काही काळापूर्वी त्याचे अक्षर पाहून अजित पवार प्रभावित झाले होते. त्यांनी विराजला निवांत भेटण्यासाठी येण्याचे निमंत्रण दिले होते. मात्र नियतीच्या खेळामुळे त्यांची प्रत्यक्ष भेट होण्यापूर्वीच अजितदादांचे निधन झाले आणि ही भेट अधुरीच राहिली.

### मुंबईत सुनेत्रा पवारांची भेट

या आठवणी मनात जपत विराज आपल्या पालक व शिक्षकांसह मुंबईला गेला. तेथे त्याने आमदार काशीनाथ दाते यांच्या माध्यमातून सुनेत्रा पवार यांची भेट घेतली. या भेटीत त्याने अजितदादांनी दिलेल्या निमंत्रणाची आठवण सांगितली आणि आपल्या सुंदर हस्ताक्षरात लिहिलेली एक भावनिक प्रतिमा त्यांना भेट म्हणून दिली.

### हस्ताक्षरातून व्यक्त केल्या भावना

विराजने दिलेल्या संदेशात, ''दादांना भेटायचे राहून गेले, पण तुम्हाला भेटून ते अधुरे स्वप्न पूर्ण झाल्यासारखे वाटते. तुमच्या आशीर्वादाने मी चांगला नागरिक होण्याचा प्रयत्न करीन,'' अशा भावना व्यक्त केल्या. या भावनिक शब्दांनी उपस्थितांना भारावून टाकले.

### चिमुकल्याच्या भावनेला दाद

विराजच्या या सुंदर अक्षरांमधील भावना आणि त्याच्या साधेपणाने सुनेत्रा पवार यांनाही भावूक केले. ग्रामीण भागातील विद्यार्थ्याने आपल्या प्रतिभा व संस्कारांच्या जोरावर व्यक्त केलेल्या या भावनांचे कौतुक करण्यात आले. धोत्रे खुर्दसारख्या छोट्याशा गावातून पुढे आलेल्या या विद्यार्थ्याने केवळ हस्ताक्षरातूनच नव्हे, तर आपल्या संवेदनशील विचारांतूनही सर्वांची मने जिंकली आहेत.

# तंत्रमंत्र

विज्ञानयुगातील बितंबातम्या

# काय आहे 'स्मार्ट'पिन?

**स्मार्टफोननंतर काय हा प्रश्न सर्वसामान्य वापरकर्त्यांना पडत आहे, त्याच्या कितीतरी आधीपासून तंत्रज्ञान क्षेत्र त्यावर उत्तर शोधत आहे. भ्रमणध्वनीपासून ते स्मार्टफोनपर्यंत झालेल्या संपर्क- संवादाच्या तंत्रज्ञान क्रांतीनंतर 'वेअरेबल' उपकरणांनी हे उत्तर बनण्याचा प्रयत्न केला खरा; पण त्यांच्या मर्यादा अल्पकाळातच स्पष्ट झाल्या आहेत. अशा वेळी स्मार्टफोनच्या क्षमतेच्या जवळपास जाऊ शकेल, असे एक उपकरण गेल्या आठवड्यात जगासमोर सादर झाले. 'एआय पिन' असे त्याचे नाव. आर्टिफिशियल इंटिलिजन्सच्या साह्याने स्मार्टफोनची अनेक कामे करू शकणारे हे उपकरण कसे आहे जाणून घेऊया...**




## काय आहे एआय पिन...

एआय पिन हे साधारणपणे हाताच्या तीन बोटांच्या दोन पेरांइतक्या आकाराचे चौकोनी डिव्हाइस आहे. यात एक प्रोसेसर संगणक, एक बॅटरी आणि या दोघांना जोडणारे हूक असे तीन मुख्य भाग आहेत. हे उपकरण शर्टच्या कॉलरजवळ किंवा छातीजवळ कपड्यावर लावता येते. उपकरणाच्या दर्शनी भागावर स्पर्श करताच ते कार्यान्वित होते. त्यानंतर तुम्ही बोटांच्या हालचाली किंवा आवाजी सूचनेद्वारे हे उपकरण हाताळू शकता. एखाद्या ब्लूटूथ इअरबड्सच्या पेटीच्या आकाराच्या या उपकरणाला कोणताही डिस्प्ले वा बटण नाही. मात्र हे उपकरण १३ मेगापिक्सेल क्षमतेची छायाचित्रे टिपू शकते. याशिवाय हे उपकरण आवाजी सूचनेद्वारे अक्षरी संदेशही पाठवू शकते. तसेच आवाजी सूचनेद्वारे कॉल लावू अथवा घेऊही शकते. या उपकरणात एक लेझर प्रोजेक्टर असून, त्याची प्रतिमा तळहातावर घेऊन आलेल्या कॉलची किंवा संदेशाची माहिती आपल्याला पाहता येते. शिवाय हे उपकरण संगीत ऐकण्याचा आनंदही लुटता येतो. या उपकरणात व्हिडिओ रेकॉर्डिंगचीही व्यवस्था आहे. यामध्ये अंतर्गत चॅट जीपीटी ही यंत्रणाही सक्रिय करण्यात आली असून त्याद्वारेही सर्च करणे, परिसराची माहिती मिळवणे आदी क्रिया करता येतात. एआय पिन कार्यान्वित करण्यासाठी त्याला बोटांनी स्पर्श करावा लागतो. त्यानंतर त्याच्या दर्शनी भागातील एलईडी सुरू होतो. त्यामुळे हे उपकरण सुरू आहे की नाही, हे वापरणाऱ्याबरोबरच समोरील व्यक्तीलाही समजते. या उपकरणाचा वापर छुप्या पद्धतीने व्हिडीओ रेकॉर्डिंगसाठी किंवा छायाचित्रणासाठी होऊ नये, अशी त्यामागची मूळ संकल्पना आहे.

## स्मार्टफोनला पर्याय ?

एआय पिन या उपकरणामध्ये संपर्क, संवाद साधण्याची तसेच संगीत ऐकण्याची, छायाचित्रणाची, शोध घेण्याची सुविधा आहे. त्यामुळे हे उपकरण स्मार्टफोनच्या अनेक क्रिया करते. मात्र, यामध्ये विविध ॲप हाताळण्याची सुविधा नाही. शिवाय वेबसाइट पाहणे किंवा चित्रपट पाहण्याची व्यवस्था नाही. अर्थात ही उपकरणाची प्रथम आवृत्ती असून त्यामध्ये येत्या काळात आणखी बदल होण्याची शक्यता आहे. या उपकरणाचा सर्वात मोठा फायदा म्हणजे, स्मार्टफोनवरील कोणतीही क्रिया करताना त्याच्या डिस्प्लेवर नजर खिळवावी लागते. एआय पिन वापरताना यातून सुटका होते. या उपकरणासमोर एखादी वस्तू धरताच ती स्कॅन करून त्याचा इंटरनेटवर शोध घेण्याचे कामही हे उपकरण करते. एवढेच नव्हे तर त्या वस्तूची ऑनलाइन किंमत तपासून ऑनलाइन ऑर्डर करण्याची सुविधाही या उपकरणातून मिळते. एआय पिन अमेरिकेत १६ नोव्हेंबरपासून विक्रीस उपलब्ध झाले आहे. याची अमेरिकेतील किंमत ६९९ डॉलर इतकी असून त्यावर दरमहा २४ डॉलर हे शुल्क डेटा नेटवर्कसाठी आकारण्यात येणार आहे. पुढील वर्षीपासून आणखी काही देशांत हे उपकरण उपलब्ध होईल, असे सांगण्यात येत आहे.




## एआय पिनचे निर्माते कोण ?

ह्यूमन या कंपनीने एआय पिनची निर्मिती केली असून इम्रान चौधरी आणि बेथनी बाँजोर्नो हे तंत्रज्ञ दाम्पत्य या कंपनीचे संस्थापक आहे. ब्रिटिश-अमेरिकन असलेले इम्रान चौधरी हे १९९५ मध्ये ॲपल कंपनीत प्रशिक्षणार्थी म्हणून नोकरीला लागले. तिथेच ॲपलच्या डिझाइन विभागाचे संचालक बनले. त्यांच्याकडे ॲपलच्या विविध उत्पादनांची रचना ठरवण्याची जबाबदारी होती. मूळ आयफोनच्या इंटरफेसची रचना करण्याचे श्रेय चौधरी यांच्याकडे जाते. आयफोन, आयपॅड, मॅक, ॲपल टीव्ही या उत्पादनांतील शंभरहून अधिक पेटंट चौधरी यांच्या नावावर आहेत. ॲपलचे संस्थापक स्टीव्ह जॉब्स यांच्या निधनानंतर चौधरी यांचे नवीन सीईओ टीम कूक यांच्याशी पटेनासे झाले आणि त्यांनी त्यांच्या पत्नी बेथनी यांच्यासह ॲपलला सोडचिठ्ठी देऊन 'ह्यूमन'ची स्थापना केली. 'एआय पिन' हे ह्यूमनचे पहिलेच उत्पादन आहे.

# लॅपटॉपचा कीबोर्ड घरच्या घरी करा रिपेअर

- सॉफ्ट ब्रश वापरा : कीबोर्ड साफ करण्यासाठी सॉफ्ट ब्रश वापरा. कारण या ब्रशने तुम्हाला कीबोर्डमधील लहान किटाणू आणि घाण साफ करण्यास मदत होईल आणि बटणं खराबही होणार नाहीत.
- कीबोर्ड फ्लिप करा : कीबोर्ड साफ करण्यासाठी एक सोपी टिप म्हणजे किबोर्ड फ्लिप करा तो एकप्रकारे हळुवारपणे झाडा. यामुळे कीबोर्डवर असलेली धूळ निघून जाईल.
- सॅनिटायझर वापरा : अनेक वेळा कीबोर्डवर वेगवेगळ्या प्रकारच्या गोष्टी पसरू शकतात, जसे की वेगवेगळं खाद्य देखील किबोर्डवर असू शकतं. यामुळे कीबोर्डच्या की आणि इंटरफेसवर चिकट काजळी तयार होऊ शकते. ते स्वच्छ करण्यासाठी अल्कोहोलिक सॅनिटायझर वापरा.
- योग्य साधनं वापरून साफ करा : कीबोर्डमधील लहान छिद्रे साफ करण्यासाठी तुम्ही चिमटा, मेणाचा बल्ब यांसारखी छोटी साधने वापरू शकता. तसंच टूथपिक किंवा कॉटन स्वॅब वापरा. कीबोर्ड आणि कीबोर्डमधील गॅपमधून कचरा काढण्यासाठी तुम्ही टूथपिक किंवा कॉटन स्वॅब वापरू शकता.



- हे काही सोपे आणि सोपे मार्ग आहेत ज्याचा वापर करून तुम्ही तुमचा लॅपटॉप कीबोर्ड घरीच स्वच्छ करू शकता. लक्षात घ्या की कीबोर्ड साफ करण्यापूर्वी, आपण तो पूर्णपणे बंद केला पाहिजे आणि थोडं पाणी वापरुन स्वच्छ करताना पाण्याचे थेंब जास्त विखुरू देऊ नका. तुम्ही या टिप्स फॉलो केल्यास, तुमचा कीबोर्ड जास्त काळ टिकेल आणि नवीन सारखा काम करेल.

# सेक्सटॉर्शन म्हणजे नेमके काय ?

## पीडित कसे अडकले जातात ?

**वर्षागणिक 'सेक्सटॉर्शन'च्या गुन्ह्यांमध्ये वाढ होत असल्याचे दिसते आहे. बहुतांश वेळा या गुन्ह्यातील आरोपी हे कुठल्यातरी दुर्गम खेड्यातील असतात, त्यामुळे त्यांच्यावर कार्यवाही करणे पोलिसांसाठी कठीण ठरते. त्यामुळे अशा प्रकरणांमध्ये अडकण्यापेक्षा खबरदारी घेतलेली केव्हाही चांगली, असा सल्ला सायबर गुन्हे तज्ज्ञांकडून देण्यात येतो. याच पार्श्वभूमीवर सेक्सटॉर्शन म्हणजे काय ?, या प्रकरणात पीडित कसे अडकले जातात आणि हे होऊ नये म्हणून कुठल्या प्रकारची काळजी घ्यावी हा विषय समजून घेणे नक्कीच महत्त्वाचे ठरावे...**



## आमिष दाखवले जाते...

आरोपी तरुण तसेच किशोरवयीन मुलांना आपल्या जाळ्यात ओढण्यासाठी त्यांची प्रशंसा किंवा खुशामत करतात. काही वेळेस रोमँटिक (प्रेम संबंध) नातेसंबंधाचे वचन देखील दिले जाते. ते पीडितांसोबत घनिष्ट मैत्री निर्माण करण्यासाठी खऱ्याखुऱ्या संभाषणांना सुरुवात करतात. काहीवेळा हे गुन्हेगार मुलांना मॉडेलिंग आदींचे आमिषही दाखवतात. ऑनलाइन गेम क्रेडिट्स किंवा कोड; अथवा पैसे, क्रिप्टोकरन्सी आणि भेटकार्डे यांसारखी आमिषे दाखवून त्याच्या बदल्यात त्यांचे फोटो (प्रतिमा) मिळवतात. जेथे शक्य नाही तेथे अशा स्वरूपाच्या गोष्टी मिळविण्याकरिता संगणक हॅक करतात. हे गुन्हेगार सामान्यतः एका प्लॅटफॉर्मवर पीडित व्यक्तीशी प्रथम संपर्क साधतात, नंतर त्यांना दुसऱ्या किंवा तिसऱ्या प्लॅटफॉर्मवर संपर्क साधण्यास सांगतात, एनक्रिप्टेड संदेश पाठवतात. ज्यामुळे त्यांच्या गुन्ह्यांचा मागोवा घेणे अधिक कठीण होते.

- गेल्याच आठवड्यात एका ३६ वर्षीय व्यक्तीने 'सेक्सटॉर्शन'मुळे मानसिक तणावाखाली माटुंगा स्थानकाजवळ रेल्वेखाली आत्महत्या केली. ही व्यक्ती मूळची डोंबिवलीची होती. या प्रकरणात एका स्त्रीने फेसबुकच्या माध्यमातून ओळख वाढवून त्या व्यक्तीची चित्रफीत तयार केली आणि त्या चित्रफितीस अश्लील स्वरूप देण्यात आले, असे नंतरच्या पोलीस तपासात निष्पन्न झाले. त्या चित्रफितीचा वापर करूनच मयत व्यक्तीला ब्लॅकमेल करण्यात आले. त्या व्यक्तीकडून दोन लाखांची खंडणी मागण्यात आली. हे प्रकरण इतक्यावरच थांबले नाही, तर एकदा पैसे दिल्यानंतरही मागणी सुरूच राहिली. त्यामुळेच या जाचाला कंटाळून या व्यक्तीने आत्महत्या केल्याचे, त्याने चिठ्ठीत नमूद केले आहे.



- सेक्सटॉर्शन हा एक सायबर गुन्हा- सायबर फसवणूक आहे. आजच्या इंटरनेटच्या जगात आपण सहजच एखाद्या अनोळखी व्यक्तीशी संभाषण 'चॅटिंग'च्या माध्यमातून सुरू करतो, ओळख वाढते, मोबाईल नंबर्सची देवाणघेवाण होते, त्या व्यक्तीसोबत व्हिडीओ कॉल सुरू होतात आणि याचीच परिणती 'प्रेम, आकर्षण, वासना' यांसारख्या भावनांमध्ये होते. अखेरीस त्यातूनच न्यूड- नग्न प्रतिमांची अदलाबदल किंवा व्हिडिओ कॉलच्या माध्यमातून या सगळ्याचे प्रदर्शन होते. बऱ्याच वेळा नग्नता नसली तरी केवळ कॉलच्या माध्यमातून रेकॉड झालेल्या प्रतिमांना तसे स्वरूप दिले जाते. एकदा का आरोपीचे काम झाले की, खंडणीसाठी कॉल येतात. तुम्ही ठरलेली खंडणी दिली नाही तर तुमच्या अश्लील, नग्न प्रतिमा, चित्रफिती प्रसारमाध्यमांवर व्हायरल करण्याची धमकी दिली जाते. या प्रकरणांमध्ये केवळ पुरुषच नाही तर महिला पीडितांची संख्याही वाढते आहे.



### आभास हा...

सेक्सटॉर्शन प्रकरणात खोटी अकाऊंट्स तयार केली जातात, फेसबुक किंवा इतर ठिकाहून सामान्य दिसणाऱ्या महिलेचे फोटो डाउनलोड केले जातात. या अकाऊंट्ससाठी त्या सामान्य महिलांचे फोटो डीपी म्हणून वापरले जातात, तसेच त्या अकाऊंट्सना सामान्य दिसणाऱ्या महिलांची नावे ही दिली जातात, जेणेकरून समोरच्या व्यक्तीला ती अकाऊंट्स खरी वाटतील. या प्रकरणात प्रत्यक्ष संभाषण व्हॉट्स ॲप आणि व्हिडिओ कॉलवर होते, मूलतः बहुतांश वेळेस कधीच खरी स्त्री नसते, या संभाषणात पीडीत समोरचा फ्रंट कॅमेरा वापरत असताना; आरोपी मात्र नेहमी मोबाईलच्या मागच्या बाजूस असलेला रेअर कॅमेरा वापरतो आणि पॉर्न साईटवरून एका स्त्रीचे अर्धवट नग्न शरीर दिसेल याची काळजी घेतो आणि कॉल संपताच टार्गेटला पैशांची मागणी करणारा मेसेज येतो.

### बाहेर पडणे अधिक गुंतागुंतीचे

बहुतांश वेळा पैसे किंवा खंडणी देऊन आपली यातून सुटका होईल असे पीडितांना वाटते. त्यामुळे पैसे देऊन हा प्रकार मिटविण्याचा प्रयत्न केला जातो, आणि गुन्हा नोंदविला जात नाही. परंतु हे सत्र तसेच सुरू राहते, पीडितांना भारतभरातून आसाम, ओडिसा, पश्चिम बंगाल, राजस्थान अशा वेगवेगळ्या ठिकाणांवरून कॉल्स येतात. राजस्थानमधील भरतपूर-अलवर पट्ट्यातील टोळ्या या 'सेक्स्टॉर्शन रॅकेट' चालविण्यात अग्रेसर आहेत, असे पोलीस तपासात लक्षात आले आहे.

### राजस्थान रडारवर

सेक्सटॉर्शन रॅकेट्स मिनी कॉटेज इंडस्ट्रीज (छोटेखानी कुटिरोद्योग) प्रमाणे चालवले जातात. या बहुतांश टोळ्या राजस्थानातून कार्यरत आहे. भरतपूर, अलवर पट्ट्यातील गावागावांमध्ये अर्थार्जनाचा स्त्रोत म्हणून याकडे पाहिले जाते. विशेष म्हणजे हे उद्योग आरोपींच्या घरातूनच चालविले जातात. मोबाईल, लॅपटॉप, सिम कार्ड्स इत्यादी सारख्या कमी साधनांच्या वापरातून या टोळ्या कार्यरत आहेत. स्थानिक पातळीवर त्यांची ओळख 'लाडकीवाला' म्हणून आहे. या बाबत गावात सगळ्यांना माहीत असले तरी, कोणीही तक्रार करत नाही. उलट पोलिसांच्या धाडीत त्यांच्याच समर्थनार्थ गावकरी उभे राहतात. या कामात अल्पवयीन मुलांचा सहभाग मोठ्या प्रमाणात आहे.

## गुन्ह्याची मोडस ऑपरेंडी

'सेक्सटॉर्शन'च्या या गुन्ह्यासाठी एक ठरावीक मोडस ऑपरेंडी वापरली जाते. सर्वसाधारणपणे पीडितांबरोबर खोटा संबंध निर्माण करणे, चॅट दरम्यान गुप्तपणे व्हिडिओ आणि संदेश रेकॉर्डिंग करणे, किशोरवयीन मुलांशी संपर्क साधण्यासाठी एखादी ओळख वापरणे असे मार्ग सर्रास वापरले जातात. त्याचप्रमाणे अनेकदा वयाने लहान किंवा विरुद्ध लिंगी असल्याचे आरोपीकडून भासवले जाते. लैंगिक प्रतिमा चोरण्यासाठी समाजमाध्यमांवरील खाती हॅक करणे, पिडितांनी फोटो पाठवण्यास नकार दिल्यास आत्महत्येची धमकी, पीडितांबद्दल अधिक जाणून घेण्यासाठी सार्वजनिक सोशल मीडिया प्रोफाइलला भेट देणे, ज्यामध्ये पीडितांच्या फ्रेंड लिस्टमध्ये प्रवेश करणे आणि प्रतिष्ठेला हानी पोहोचवणारी इतर वैयक्तिक माहिती शोधणे आदी बाबींचाही या मोडस ऑपरेंडीमध्ये समावेश होतो.

## सेक्सटॉर्शन कसे केले जाते ?

आरोपी ज्या व्यक्तीला फसवायचे आहे, त्या व्यक्तीशी संपर्कात राहण्याचा प्रयत्न करतात. सोशल मीडियावर अनेकदा मैत्रीसाठी विनंती वारंवार केली जाते. मुख्यतः तरुणवयीन त्याचप्रमाणे किशोरवयीन मुले त्यांचे लक्ष्य असतात. असे असले तरी गेल्या दोन वर्षांत असे लक्षात आले आहे की, मध्यमवयीनांची संख्याही तेवढीच वाढते आहे, परंतु या वयोगटातील लोकांकडून लोकलज्जेस्तव त्या गुन्ह्यांची तक्रार करणे टाळले जाते. दाखल गुन्ह्यांच्या आकडेवारीनुसार यामध्ये अल्पवयीन मुलांशी संबंधित गुन्ह्यांचे प्रमाण ७० टक्क्यांहून अधिक आहे, तर आजपर्यंत झालेल्या एकूणच गुन्ह्यांचे स्वरूप पाहता अल्पवयीन मुलांबरोबरीनेच वय वर्षे ४० च्या आसपास असलेल्या मध्यमवयीन पुरुषांचा समावेशही पीडितांमध्ये अधिक आहे. कोण किती खंडणी देऊ शकेल आणि त्यानंतर वाच्यता कोण करणार नाही, याचाही विचार आरोपींनी गुन्हा घडताना केलेला असतो, असे अनेक तपासांमध्ये लक्षात आले आहे.

## काय टाळाल ?

घरात किशोरवयीन मुले असतील आणि त्यांना धमक्या आल्या तर त्याविरोधात तक्रार करण्यास शिकवा. ते तणावग्रस्त किंवा लाजिरवाणे असले तरी, त्यांच्याशी ऑनलाइन सुरक्षिततेबद्दल बोला आणि त्यांना संशयास्पद ईमेल किंवा मेसेजेस आले तर काय करायचे, याची कल्पना द्या. शिवाय सायबरतज्ञ सांगतात की, तुमच्या घरातील रेकॉर्डिंग उपकरणांपासून सावध रहा. काही कमी सुरक्षित उपकरणे, जसे की बेबी मॉनिटर्स आणि नॅनी-कॅम यांच्या माध्यमातून लैंगिक शोषण केले जाऊ शकते. गृहीत धरा की, तुमचा वेबकॅम किंवा रेकॉर्डिंग डिव्हाइस तिसऱ्या व्यक्तीकडून सक्रिय केले जाऊ शकते. तुमचा फोन किंवा इतर इलेक्ट्रॉनिक कॅमेरा उपकरणे गोपनीय ठिकाणी सक्रिय राहणार नाहीत याची काळजी घ्या. तुम्ही तुमचा वेबकॅम वापरत नसताना झाकून ठेवा; तुमच्या वेबकॅममध्ये अंगभूत कव्हर नसल्यास, ते झाकण्यासाठी स्टिकर किंवा टेपचा तुकडा वापरा. अशा प्रकरणांत घाबरून जाण्यापेक्षा जवळच्या व्यक्तीला विश्वासात घेऊन सगळं सांगा, त्यामुळे मदत मिळू शकते. भावनाविवश होऊन कुठलाही चुकीचा निर्णय घेऊ नका, असा सल्लाही सायबर पोलीस देतात.



## काय खबरदारी घ्याल ?

प्रत्यक्षात परिचयाच्या नसलेल्या कोणाचीही ऑनलाइन फ्रेंड रिक्वेस्ट स्वीकारू नका, असा सल्ला सायबरतज्ञ नेहमीच देतात. कोणत्याही अनोळखी व्यक्ती बरोबर ईमेल किंवा सोशल मीडिया हँडल्स शेअर करू नका. तुम्ही ओळखत नसलेल्या व्यक्तीने तुमची वैयक्तिक माहिती विचारली तर 'नाही' म्हणा. तुमचा पासवर्ड कधीही कोणाशीही शेअर करू नका. पाळीव प्राण्यांची नावे, जन्मतारीख आदी अंदाज लावण्याइतके सोपे पासवर्ड वापरू नका. तुम्हाला माहीत नसलेल्या लोकांकडून आलेल्या ई-मेलमधील लिंकवर क्लिक करू नका; असे केल्याने हॅकर्स तुमच्या उपकरणाशी जोडला जाऊ शकतो.

## शॉर्ट न्यूज

### तहसील कार्यालयावर जनआक्रोश मोर्चा

**श्रीगोंदा :** तालुक्यातील काष्टी गावात मुख्य शाखा असलेल्या साईसेवा ग्रामीण पतसंस्था आणि साईसेवा मल्टिस्टेटमध्ये मागील सहा महिन्यांपासून ठेवीदारांचे कोट्यवधी रुपये अडकले आहेत. यामुळे संतप्त झालेल्या ठेवीदारांनी श्रीगोंदा तहसील कार्यालयावर जनआक्रोश मोर्चा काढला आणि तहसीलदारांना निवेदन दिले. या घटनेमुळे ठेवीदारांमध्ये मोठी नाराजी पसरली आहे.

### बालगृहातील दोन अनाथ मुले बेपत्ता

**पाथर्डी :** येथील मोहरी रोडवरील दिव्यांग मुलांच्या बालगृहातून दोन अनाथ मुले बेपत्ता झाल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी बालगृहाचे अधीक्षक संभाजी शिवाजी झावरे यांनी अज्ञात व्यक्तीविरुद्ध पाथर्डी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली असून गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### चिचोंडी ग्रामस्थांचा रास्ता रोको

**चिचोंडी :** येथे मारहाण प्रकरणातील आरोपींना तात्काळ अटक करण्याच्या मागणीसाठी माजी मंत्री प्राजक्त तनपुरे यांच्या नेतृत्वाखाली कोल्हार रस्त्यावर रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. भगवान फुलमाळी व भास्कर आटकर यांना मारहाण केल्याप्रकरणी आरोपींना अटक करून त्यांच्यावर तडीपारीची कारवाई करण्याची मागणी तनपुरे यांनी केली.

### स्वच्छता कर्मचाऱ्यांना विषबाधा

**श्रीरामपूर :** नगरपालिकेच्या आरोग्य विभागात जंतुनाशक फवारणी करताना चार स्वच्छता कर्मचाऱ्यांना विषबाधा झाली. पावडरच्या तीव्र वासामुळे मळमळ आणि चक्कर आल्याने त्यांना साखर कामगार रुग्णालयाच्या अतिदक्षता विभागात दाखल करण्यात आले. आरोग्य अधिकाऱ्यांनी कर्मचाऱ्यांनी मास्क आणि ग्लोव्हज वापरल्याचा दावा केला आहे. सुनील बागडे (५०), चंद्रकांत दळवी (५६), गोकुळ मारसाळे (३४) आणि अरुण अस्वले (३५) या चार कर्मचाऱ्यांची प्रकृती सध्या स्थिर आहे.

### दोन लाखाच्या विदेशी दारुची चोरी

**संगमनेर :** तालुक्यातील तळेगाव दिघे येथील हॉटेल रुपेश बिअर बार व परमिट रूममध्ये अज्ञात चोरट्यांनी खिडकीचे गज कापून प्रवेश केला. रात्रीच्या सुमारास त्यांनी २ लाख ३ हजार ५५० रुपये किमतीच्या नामांकित कंपनीच्या विदेशी दारूच्या बाटल्या आणि डीव्हीआर चोरून नेले. या प्रकरणी संगमनेर तालुका पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# अंभोरा ग्रामपंचायतला 'आयएसओ' मानांकन

## ग्रामस्थांना मोफत सुविधा देणारे अंभोरा गाव आदर्श गावाच्या दिशेने

**अंभोरा : प्रतिनिधी**

**बीड जिल्ह्यातील आष्टी तालुक्यातील अंभोरा गाव ग्रामस्थांना विविध सुविधा मोफत पुरवून आदर्श गाव बनण्याच्या दिशेने वाटचाल करत आहे. गावातील सुशासन, लोकसहभाग आणि नाविन्यपूर्ण उपक्रमांच्या जोरावर अंभोरा ग्रामपंचायतीला नुकतेच 'आयएसओ' मानांकन प्राप्त झाले असून गावाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.**

अंभोरा ग्रामपंचायतीमार्फत गावातील सर्व नागरिकांना मोफत शुद्ध पिण्याचे पाणी पुरवले जाते. ग्रामपंचायतीच्या स्वमालकीच्या पीठ गिरण्यांमधून करभरणा केलेल्या नागरिकांना वर्षभर ज्वारी, बाजरी, गहू आदी धान्याचे मोफत दळण करून दिले जाते. यासाठी ग्रामपंचायतीने स्वतंत्र कर्मचारी नियुक्त केला आहे. तसेच तेल काढणी यंत्र, मिरची कांडप यंत्र व कडबा कुट्टी यंत्र यांच्या माध्यमातूनही ग्रामस्थांना मोफत सेवा पुरवली जाते.

गावातील महिलांसाठी ग्रामपंचायत संचलित 'सखी प्रेरणा भवन' खुले असून येथे सॅनिटरी पॅड वेंडिंग मशीन आणि स्मार्ट बर्नर बसविण्यात आले आहेत. स्वयंसहाय्यता बचत गटांच्या उत्पादन वाढीसाठी ग्रामपंचायतीने बंदिस्त जागा उपलब्ध करून दिली आहे.

नव्याने उभारण्यात आलेले डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम ज्ञानमंदिर गावकऱ्यांच्या सेवेत दाखल झाले असून येथे ग्रंथालय, वाचनालय आणि अभ्यासिकेच्या सुविधा मोफत उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. ग्रामपंचायतमार्फत गावातील नागरिकांना आवश्यक असणारे सेवा दाखले मोफत दिले जातात.

ग्रामपंचायत समोर लोकसहभागातून प्रशस्त सभागृह उभारण्यात आले आहे. या सभागृहात होणाऱ्या विवाह समारंभासाठी ५ हजार रुपये शुल्क आकारले जाते आणि त्याच कार्यक्रमात कन्यादान योजनेतून मुलीच्या वडिलांना ५००१ रुपये देण्यात येतात. ग्रामपंचायतमार्फत गावातील ३५० करदात्यांना फवारणी पंपांचे वितरण करण्यात आले आहे. आयुष्मान भारत योजनेअंतर्गत कार्ड काढण्यासाठीही ग्रामस्थांना सहाय्य केले जाते. तसेच जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेच्या भव्य इमारतीचे बांधकाम प्रगतीपथावर आहे.शालेय विद्यार्थ्यांना ग्रामपंचायतमार्फत मोफत स्पोर्ट्स शूज वाटप करण्यात आले असून शाळेसाठी प्रशस्त स्वच्छतागृह उभारण्यात आले आहे.


Certificate of Registration
This is to certify that
GRAMPANCHAYAT AMBHORA
PANCHAYAT SAMITI-ASHTI, DISTRICT-BEED,INDIA.
ISO 9001:2015
Quality Management System

गावात मोठ्या प्रमाणावर वृक्षलागवड करण्यात आली असून नागरिकांनाही वृक्षरोपांचे वाटप केले आहे. वृक्षांचे उत्तम संवर्धन करणाऱ्यास ३००१ रुपयांचे बक्षीस देण्याची योजना राबवली आहे.विद्यार्थ्यांमध्ये अभ्यासाची सवय लागावी यासाठी गावात दररोज सायंकाळी ६ वाजता अभ्यास सायरन वाजवला जातो. सायरन वाजल्यानंतर विद्यार्थी रात्री ८ वाजेपर्यंत अभ्यासाला बसतात. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीला चालना मिळत आहे.

केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजनांची माहिती ग्रामस्थांना मोबाईलद्वारे दिली जाते व त्यांची अंमलबजावणी ग्रामपंचायतमार्फत केली जाते. डोंगराळ भाग असल्यामुळे उन्हाळ्यातील पाणीटंचाईवर मात करण्यासाठी पाणलोट विकास घटक २.० अंतर्गत दोन शेततळ्यांची कामे पूर्ण झाली आहेत. गावातील सार्वजनिक ठिकाणांचे सुशोभीकरण करण्यात आले आहे.

ग्रामपंचायतमार्फत महिलांसाठी नियमितपणे ॲनिमिया तपासणी शिबिरे, मोफत आरोग्य तपासणी, महिला उद्योजकता व कौशल्य विकास प्रशिक्षण आयोजित केले जाते. निरक्षर महिलांसाठी साक्षरता वर्गही घेतले जातात. यासाठी 'वॉटर' संस्थेची मदत घेतली जाते. तसेच नागरिकांना कायद्याचे ज्ञान मिळावे यासाठी कायदेविषयक मार्गदर्शन शिबिरे आयोजित केली जातात.

गावाला जोडणाऱ्या मुख्य रस्त्यांची कामे प्रगतीपथावर असून गावांतर्गत रस्त्यांचे काँक्रिटीकरण पूर्ण झाले आहे. महात्मा गांधी रोजगार हमी योजनेद्वारे मजुरांना रोजगार उपलब्ध करून दिला जातो. ग्राम महसूल अधिकारी व सहाय्यक कृषी अधिकारी कार्यालयांचे नूतनीकरणही करण्यात आले आहे. नागरिकांच्या तक्रारींचे निवारण व्हावे यासाठी ग्रामपंचायत कार्यालयात तक्रारपेटी ठेवण्यात आली आहे. तसेच ग्रामपंचायतीच्या वेबसाईटवरून घरबसल्या तक्रार नोंदविणे व सेवा दाखल्यांसाठी अर्ज करणे शक्य झाले आहे. या सर्व उपक्रमांमुळे अंभोरा ग्रामपंचायत सुशासनयुक्त ग्रामपंचायतीचे आदर्श उदाहरण ठरली आहे.

विकासासाठी कटीबद्ध

''अंभोरा गावच्या सर्वांगीण विकासासाठी आम्ही नेहमीच कटिबद्ध असून नागरिकांना सर्व सोयी-सुविधा उपलब्ध करून देणे हे आमचे कर्तव्य आहे.''

सागर आमले
लोकनियुक्त सरपंच, अंभोरा


लोकसहभागातून ग्रामविकास

''गावातील शेवटच्या वंचित घटकाला केंद्रस्थानी मानून आम्ही कार्य करत आहोत. संविधानातील मार्गदर्शक तत्त्वांची अंमलबजावणी करून लोकसहभागातून ग्रामविकास साध्य करत आहोत.''

दिपक नरवडे
ग्रामविकास अधिकारी, अंभोरा

वाचकांच्या लेखणीतून

## सुसंस्कृत राजकीय नेता



महाराष्ट्र राज्याचे पहिले मुख्यमंत्री, केंद्रशासनात उपपंतप्रधानपद भूषविणारे, संरक्षण, अर्थ, परराष्ट्र आदी खाती सांभाळणारे मंत्री, मराठीतील एक थोर साहित्यिक व्यक्तीमत्व असलेल्या यशवंतराव चव्हाण यांचा १२ मार्च हा जन्मदिवस.

यशवंतराव काँग्रेसी नेते होते. संयुक्त महाराष्ट्र चळवळीत ते बदनाम झाले होते. चालायचेच. राजकारण म्हटल्यावर बदनामीचे दोन शिंतोडे उडणे आलेच!

आणिबाणीनंतर काँग्रेस सत्तेवरून पायउतार झाली. विरोधी पक्षनेता म्हणून आपली भूमिका निभावणे यशवंतरावांना अवघडच गेले. सदा सत्तेच्या घोड्यावर स्वार असणारे यशवंतराव आपल्याला पाय आहेत हेच विसरून गेले! या राजकीय संक्रमणात जुने सत्ताधारी विरोधक झाले. जुने विरोधक सत्ताधारी झाले. या वेळी दोन्ही राजकीय पक्षांची चांगलीच हबेलंडी उडाली! ती आमच्या पिढीने पाहिली!

एवढे महाभारत होऊनही यशवंतराव आपले राजकीय नेतृत्वाचे स्थान टिकवून राहिले. आधुनिक महाराष्ट्र राज्य उभारण्यात त्यांचा मोठा सहभाग होता. केंद्र शासनात असतानाही त्यांनी महाराष्ट्राची आणबाण आणि शान टिकवून ठेवली.

यशवंतराव जसे राजकीय नेते होते तसेच ते उत्कृष्ट साहित्यिकही हौते. त्यांना कृष्णाकाठ हे आत्मचरित्र लिहावयाचे होते. पण ते पूर्ण होऊ शकले नाही याचे दुःख होते. सह्याद्रीचे वारे, शिवनेरीच्या नौबती, परिवर्तनाचे प्रवाह हे त्यांच्या भाषणांचे संग्रह आहेत. समतोल आणि स्पष्ट विचार, सुसंस्कृत भाषा, थेट साहित्यप्रांतात शोभून दिसणारे त्यांचे शब्द रसिकांची मने जिंकून घेत.रसिक निर्माण करता येत नाही. रसिक असावा लागतो. हे एक त्यांचे सुभाषित मोक्तिक. त्यांचे भाषण ऐकणे ही रसिक श्रोत्यांसाठी मोठीच पर्वणी असे.

मराठवाडाकार आणि यशवंतरावांचे टीकाकार अनंत भालेराव यांनी म्हटले आहे, यशवंतरावांच्या ''राजकीय व्यक्तीमत्वाला व्यापक चिंतनाची, रसज्ञतेची, गुणग्राहकतेची व विवेकी शालीनतेची जोड मिळाली होती. त्यामुळे टिळकांच्या नंतर त्यांच्या इतका दुसरा (मोठा) नेता महाराष्ट्रात झाला नाही.''

मी गावी शाळेत असताना यशवंतरावांना पाहण्याचा आणि ऐकण्याचाही योग आला होता. त्यावेळी वैचारिक प्रगल्भता माझ्याकडे नव्हती. ते साहजिकच आहे. पण त्यांचा शुभ्र नेहरू सदरा, त्यावर बिनबाह्यांचा तांबूसपिवळ्या रंगाचा कोट, एकटांगी अक्कडबाज शुभ्र धोतर आणि डोक्यावर पांढरी शुभ्र टोपी असा खादीचा पोषाख. मुखावर झळकणारी गुलाबी छबी असलेली ती मूर्ती मी कधीच विसरू शकणार नाही.

महाराष्ट्रात असा सुसंस्कृत राजकीय नेता आता नाही. पुढेही होणार नाही! यशवंतराव चव्हाणांच्या जयंतीनिमित्त त्यांना माझे शतशत प्रणाम!

**नाना ढवळे**
८२८६९१३२२३
निघोज, ता. पारनेर,
जि. अहिल्यानगर

# गॅस टंचाईवर शेगाव संस्थानची मात!

## स्टीम बॉयलरच्या सहाय्याने शिजते अन्न । गजानन महाराजांचा महाप्रसाद अखंड सुरू

**शेगाव : प्रतिनिधी**

**इराण, अमेरिका आणि इस्राइलमध्ये सुरू असलेल्या युद्धाचा परिणाम भारतावरही होताना दिसत आहे. अनेक राज्यांमध्ये गॅसची तसेच इंधनाची टंचाई निर्माण झाली आहे. यामुळे मुंबई-पुण्यासारख्या शहरांमध्ये अनेक हॉटेल व खानावळी बंद होण्याच्या मार्गावर आहेत. गॅसची टंचाई निर्माण झाल्याने याचा फटका हॉटेल व्यवसायांना बसत आहे. अशी परिस्थिती असताना शेगावमध्ये दररोज मोठ्या संख्येने होणाऱ्या महाप्रसाद वाटपावर परिणाम झाला नसल्याचे समोर आले आहे.**

राज्यात संत गजानन महाराजांचे दर्शनासाठी दररोज हजारो भाविक येतात. त्या अनुषंगाने महाप्रसाद वाटप व



भोजनाचा लाभ जवळपास ३५ हजार लोक दररोज घेत असतात. एवढ्या भाविकांसाठी गॅसचा वापर किती होईल, हे सांगता येणे शक्य नाही. मात्र अन्न हे पुर्णब्रम्ह मानून शेगाव संस्थानच्या वतीने स्टीम बॉयलरचा वापर महाप्रसादासाठी केला आहे. त्यामुळे अन्न हे वाफेवर शिजत असून त्यासाठी लाकडच्या गट्टुचा वापर केल्या जात आहे.

या गट्टूची खरेदी वर्षभरातून एकदा केली जाते. गट्टु लाकडाच्या इंधनापेक्षा कमी लागतात. महाप्रसाद निर्मितीपासून तर भोजन वाटपापर्यंत जवळपास अठरा एकर जागा संस्थानची आहे. त्यात गोदामासह स्टीम बॉयरलच्या स्वयंपाक गृहाचा समावेश आहे. या ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे लावले असून अद्यावत यंत्रणेद्वारे पोळ्या व भाजी तयार केली जाते.

( पान १ वरून)

### मुंबई टार्गेटवर ?

इशारा देण्यात आला होता. ही माहिती मिळताच पोलिस आणि सुरक्षा यंत्रणा तातडीने सक्रिय झाल्या. बॉम्ब शोधक व नाशक पथकाने त्वरित तपास सुरू करत संपूर्ण परिसराची पाहणी केली.

या धमकीत केवळ विधानभवनाचाच उल्लेख नसून मुंबईतील आणखी चार महत्त्वाच्या ठिकाणांना लक्ष्य करण्याचा इशाराही देण्यात आला होता. त्यामध्ये बॉम्बे स्टॉक एक्सचेंज, मुंबई उच्च न्यायालय, मुंबई मेट्रो आणि एका बँकेचा समावेश असल्याचे सांगण्यात आले. या सर्व ठिकाणांना मिसाईल आणि बॉम्बने उडवून देण्याची धमकी मेलमध्ये नमूद करण्यात आली होती. त्यामुळे शहरातील सुरक्षा यंत्रणांनी तत्काळ खबरदारी घेत विविध संवेदनशील भागांमध्ये सतर्कता वाढवली.

प्रा. राम शिंदे यांनी सांगितले की, या प्रकरणाची सखोल चौकशी सुरू आहे. सुरक्षेच्या कारणास्तव सर्व माहिती लगेच सार्वजनिक करणे योग्य ठरणार नाही. मात्र संबंधित यंत्रणा सतर्क असून पोलिसांकडून तपास सुरू आहे. सुरुवातीच्या तपासात धमकीचा मेल खलिस्तानी आंदोलनाशी संबंधित असण्याची शक्यता समोर आली असल्याची माहितीही मिळत आहे. या पार्श्वभूमीवर गृह विभागाने सर्व सुरक्षा यंत्रणांना सतर्क राहण्याच्या सूचना दिल्या आहेत.

पोलिसांकडून सखोल तपास सुरू

दरम्यान, या घटनेनंतर मुंबईतील महत्त्वाच्या ठिकाणी पोलिस बंदोबस्त वाढवण्यात आला आहे. ब ॉम्ब शोधक पथक, स्थानिक पोलिस आणि विशेष सुरक्षा पथकांनी विविध ठिकाणी तपासणी मोहीम सुरू केली आहे. अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरू असल्याने विधानभवन परिसरात अनेक मंत्री, आमदार आणि अधिकारी उपस्थित होते. त्यामुळे कोणताही धोका टाळण्यासाठी प्रशासनाने अतिरिक्त खबरदारी घेतली आहे. धमकी देणारा ई-मेल नेमका कुठून पाठवण्यात आला आणि त्यामागे कोण आहे याचा शोध घेण्यासाठी पोलिसांकडून सखोल तपास सुरू आहे.

### अभिषेक कळमकरांना दिलासा नाही

त्यानंतर एका सुमसाम ठिकाणी वाहन थांबवून तिच्यावर जबरदस्ती केल्याचा गंभीर आरोप तिने केला आहे. या घटनेबाबत कोणालाही सांगितल्यास नोकरी मिळणार नाही, अशी धमकी दिल्याचाही आरोप फिर्यादीत करण्यात आला आहे.

फिर्यादी महिलेच्या म्हणण्यानुसार, १८ फेब्रुवारी रोजी शिरूर येथील एका लॉजवर बोलावून आरोपीने पुन्हा तिच्यावर अत्याचार केल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. या प्रकरणानंतर तिने एमआयडीसी पोलिस ठाण्यात धाव घेत गुन्हा दाखल केला.

गुन्हा दाखल झाल्यानंतर अभिषेक कळमकर यांच्या वतीने ॲड. विकास ढोकळे यांनी जिल्हा न्यायालयात अटकपूर्व जामीनासाठी अर्ज दाखल केला होता. या अर्जावर जिल्हा व सत्र न्यायाधीश डॉ. यु. जे. मोरे यांच्या समोर सुनावणी झाली.

सुनावणीदरम्यान पिडीत महिलेचे वकील ॲड. विजय गुंदेचा यांनी हा गंभीर स्वरूपाचा गुन्हा असल्याने आरोपीला अटकपूर्व जामीन देऊ नये, असा जोरदार युक्तिवाद केला. दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकल्यानंतर न्यायालयाने फिर्यादी पक्षाचा मुद्दा ग्राह्य धरत अटकपूर्व जामीन अर्ज फेटाळून लावला.

### पुणे-नगर महामार्गावर देशातील सर्वात लांब उड्डाणपूल उभारणार

या योजनेअंतर्गत पुणे ते अहिल्यानगर महामार्गावर सुमारे ५३.४ किलोमीटर लांबीचा उन्नत मार्ग उभारण्यात येणार आहे. या प्रकल्पासाठी सुमारे ७ हजार ५१४ कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित असून त्यामध्ये ३१ किलोमीटर लांबीचा उड्डाणपूल बांधण्यात येणार आहे. हा उड्डाणपूल देशातील सर्वात लांब उड्डाणपूल ठरणार असून तो सहापदरी असेल. खराडी जंक्शनपासून रांजणगाव एमआयडीसीपर्यंत हा उड्डाणपूल उभारण्यात येणार आहे.

या मार्गाची रचना दुमजली स्वरूपाची असणार आहे. त्यामुळे या ठिकाणी तिहेरी वाहतूक शक्य होणार आहे. खराडी ते विठ्ठलवाडी या ७.४ किलोमीटरच्या पट्ट्यात खालील स्तरावर चौपदरी रस्ता राहणार असून त्यावर पहिल्या स्तरावर वाहनांसाठी उड्डाणपूल आणि त्याच्या वरच्या स्तरावर मेट्रो मार्गिका उभारली जाणार आहे. या सुविधेमुळे वाहतुकीवरील ताण मोठ्या प्रमाणात कमी होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

सध्या पुणे ते शिरूर या मार्गावरील प्रवासासाठी साधारण दीड ते पावणे दोन तास लागतात. मात्र उन्नत मार्ग पूर्ण झाल्यानंतर हा प्रवास अवघ्या ४५ मिनिटांत पूर्ण होणार आहे. पुढील टप्प्यात या मार्गाचा विस्तार करून शिरूर ते छत्रपती संभाजीनगरपर्यंत १९२ किलोमीटरचा द्रुतगती मार्ग उभारण्याचीही योजना आहे. या प्रकल्पासाठी सुमारे १४ हजार ८८६ कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित असून त्यानंतर पुणे ते संभाजीनगर प्रवास अवघ्या दोन तासांत पूर्ण होईल.

याशिवाय तळेगाव ते चाकण उन्नत मार्ग, चाकण ते शिक्रापूर सहापदरी मार्ग आणि पुणेसोलापूर महामार्गावरील हडपसर ते यवत या सुमारे ३१.५० किलोमीटरच्या मार्गाचा विस्तार अशा अनेक प्रकल्पांची घोषणाही करण्यात आली आहे. या सर्व प्रकल्पांमुळे औद्योगिक पट्टा, शहरातील वाहतूक आणि बाह्य दळणवळण यामध्ये मोठी सुधारणा होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

दरम्यान, ८ मार्च रोजी पुण्यात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ चौकाजवळ आणखी एका दुमजली उड्डाणपुलाचे उद्घाटन करण्यात आले. या उड्डाणपुलामुळे शहरातील महत्त्वाच्या मार्गांवरील वाहतूककोंडी कमी होईल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे. मात्र हा मार्ग सुरू होऊन काही दिवस उलटून गेले असतानाही वाहनचालकांसाठी आवश्यक दिशादर्शक फलक अद्याप बसविण्यात आले नसल्याने नागरिकांकडून नाराजी व्यक्त होत आहे.

### गॅसचा तुटवडा होणार नाही

तहसील कार्यालयांनी विशेष पथके नियुक्त केली आहेत. ही पथके गॅस एजन्सी व गोडाऊनची तपासणी करून ग्राहक कनेक्शन संख्या, सिलेंडर साठा आणि वितरण व्यवस्था यांची पडताळणी करत आहेत. नागरिकांना कोणताही त्रास होऊ नये यासाठी केंद्र व राज्य सरकार समन्वयाने काम करत असल्याचे शिंदे यांनी सांगितले.

# शिक्षणाच्या बळावर भारत बनणार विकसित राष्ट्र

## डॉ. संजय ढोले यांचा विश्वास । श्री मुलिकादेवी महाविद्यालयात राज्यस्तरीय परिषद

निघोज : सुरेश गाडीलकर

तालुक्यातील श्री मुलिकादेवी महाविद्यालय, निघोज येथे सोमवारी ''विकसित भारत २०४७ मध्ये महाविद्यालयांचे योगदान'' या विषयावर एकदिवसीय राज्यस्तरीय परिषदेचे आयोजन करण्यात आले. क्वालिटी इम्प्रूव्हमेंट प्रोग्राम व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या परिषदेत शिक्षण, संशोधन व तंत्रज्ञानाच्या माध्यमातून देशाच्या विकासात महाविद्यालयांची भूमिका अधोरेखित करण्यात आली.



### विकसित भारतासाठी उच्च शिक्षणाची भूमिका

उद्घाटन सत्राचे बीजभाषक म्हणून बोलताना डॉ. संजय ढोले (भौतिकशास्त्र विभागप्रमुख, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे) यांनी सांगितले की, विकसित भारत २०४७ चे स्वप्न साकार करण्यात महाविद्यालयांचे योगदान अत्यंत महत्त्वाचे ठरणार आहे. उच्च दर्जाचे शिक्षण, संशोधन, कौशल्य विकास आणि नवनवीन कल्पना यांमुळे देश आत्मनिर्भर, डिजिटल आणि सर्वसमावेशक बनण्यास मदत होईल. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार महाविद्यालये केवळ पदवी देणारी केंद्रे राहणार नसून उद्योग सहकार्य, डिजिटल साक्षरता आणि ग्रामीण विकासासाठी ज्ञानकेंद्र म्हणून कार्य करणार आहेत. यामुळे तरुण पिढी देशाच्या विकासाचे शिल्पकार बनेल, असे त्यांनी नमूद केले.

### विद्यार्थ्यांच्या कल्पनांना प्रोत्साहन

परिषदेच्या अध्यक्षस्थानी असलेले विश्वस्त सीताराम खिलारी यांनी विद्यार्थ्यांच्या नाविन्यपूर्ण कल्पनांना व्यासपीठ उपलब्ध करून देण्याची गरज अधोरेखित केली. उद्योगांच्या गरजांनुसार शिक्षण देणे, स्टार्ट-अप्स, तंत्रज्ञान आणि पेटंट्स यांवर भर देणे, तसेच ग्रामीण भागातील आव्हाने ओळखून शाश्वत विकासासाठी उपाय शोधणे ही काळाची गरज असल्याचे त्यांनी सांगितले. डिजिटल साक्षरता वाढवून समाजातील असमानता दूर करण्यासाठी शिक्षण क्षेत्राने पुढाकार घ्यावा, असेही त्यांनी नमूद केले.

### मान्यवरांची उपस्थिती

यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. के. आहेर यांनी मान्यवरांचे स्वागत केले. कार्यक्रमास उपप्राचार्य डॉ. मनीषा गाडिलकर, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष समन्वयक प्रा. सचिन निघुट, परिषद सहसमन्वयक प्रा. अक्षय अडसूळ, प्रा. सुरेश गाडिलकर, प्रा. स्वाती मोरे, कार्यालय प्रमुख नवनाथ घोगरे, संदीप लंके तसेच प्राध्यापक, प्राध्यापकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. अशोक कवडे व प्रा. आनंद पाटेकर यांनी केले, तर आभार प्रदर्शन लेफ्टनंट डॉ. पोपट पठारे यांनी केले

### विविध सत्रांत तज्ज्ञांचे मार्गदर्शन

परिषदेत द्वितीय सत्रात डॉ. मनोहर जाधव (माजी विभागप्रमुख, मराठी विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ) यांनी तंत्रज्ञान विकास, क्रीडा क्षेत्रातील संधी, प्रशिक्षण केंद्रांची गरज आणि शिक्षकांचे योगदान याविषयी मार्गदर्शन केले. तृतीय सत्रात प्रा. सागर म्हस्के (सहाय्यक प्राध्यापक, पारनेर महाविद्यालय) यांनी विद्यार्थ्यांच्या कौशल्य विकासावर भाष्य केले, तर चतुर्थ सत्रात डॉ. उतेकर मॅडम यांनी उच्च शिक्षणातील गुणवत्तावृद्धीच्या विविध पैलूंवर मार्गदर्शन केले.

### शोधनिबंधांचे सादरीकरण

या परिषदेत प्रा. सागर म्हस्के, प्रा. विशाल रोकडे, प्रा. धनराज तिखट आणि डॉ. गोरक्ष घोलप यांनी शोधनिबंध सादर केले. विद्यार्थ्यांमधून कु. आकाश म्हस्के यांनीही संशोधन निबंध सादर केला. राज्यभरातून सुमारे २३० प्राध्यापक व संशोधक विद्यार्थ्यांनी परिषदेत सहभाग नोंदविला.

# शहाजापूरच्या जंगलात वन्यजीवांना जीवनदान

## पाणवठा दुरुस्तीतून उन्हाळ्यात दिलासा

सुपा : प्रतिनिधी

पारनेर वन विभागाच्या वतीने शहाजापूरच्या वनक्षेत्रातील पाणवठ्याची दुरुस्ती करून जंगलातील वन्यजीवांना कडक उन्हाळ्यात मोठा दिलासा मिळाला आहे. अनेक वर्षांपासून पाण्याच्या टंचाईमुळे वन्यप्राण्यांना भटकंती करावी लागत होती. मात्र आता पाणवठ्याचे सिमेंट कॉंक्रिटीकरण करण्यात आल्याने दीर्घकाळ पाणी साठून राहणार असून वन्यजीवांची तहान भागणार आहे.



### डोंगररांगांतील समृद्ध वनक्षेत्र

शहाजापूर, सुपा व हंगा या तीन गावांच्या सीमांवर असलेल्या शहाजापूरच्या डोंगररांगांमध्ये शेकडो एकरांचे वनक्षेत्र पसरलेले आहे. या जंगलात मोठ्या प्रमाणावर हरीण, ससे, लांडगे, खोकड, कोल्हे तसेच बिबट्यासारखे वन्यप्राणी आढळतात. याशिवाय येथे मोरांची संख्याही लक्षणीय आहे. दऱ्याखोऱ्या, दाट झाडझुडपे आणि नैसर्गिक रचना यामुळे हे क्षेत्र वन्यजीवांसाठी नंदनवन मानले जाते.

### उन्हाळ्यात पाण्याची टंचाई

पावसाळा आणि हिवाळ्यात काही दिवस नैसर्गिक पाण्याचे स्त्रोत उपलब्ध असतात. मात्र वर्षातील पाच ते सहा महिने या भागात पाण्याची तीव्र टंचाई निर्माण होते. वन्यप्राण्यांना पाण्यासाठी मोठ्या प्रमाणात भटकंती करावी लागत होती. काही वर्षांपूर्वी वन विभागाने पाणवठा उभारला होता; परंतु त्यात नियमित पाणी सोडण्याची व्यवस्था नसल्याने तो फारसा उपयोगी पडत नव्हता.

### लोकसहभागातून वन्यजीवांना आधार

मागील पाच-सहा वर्षांपासून पत्रकार आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी या समस्येकडे सातत्याने लक्ष वेधले. त्यानंतर अनेक दानशूर नागरिकांनी लोकसहभागातून जंगलातील या मुक्या जीवांसाठी पाणी पुरवण्याचे काम केले. मात्र पाणवठा गळतीमुळे पाणी पाझरून जात असल्याने त्याची दुरुस्ती आणि नवीन पाणवठे उभारण्याची मागणी वन्यप्रेमींनी केली होती.

### वन विभागाचा पुढाकार

चालू वर्षी पारनेर वन विभागात नवीन अधिकारी व कर्मचारी नियुक्त झाल्यानंतर त्यांना प्रत्यक्ष पाणी परिस्थिती दाखविण्यात आली. त्यानंतर दुरुस्तीचा निर्णय घेण्यात आला. बुधवारी गजानन धाडे व साहेबराव भालेकर यांच्या मार्गदर्शनाखाली सुपा वनरक्षक अप्सर पठाण व श्री. पठाण यांनी दोन रोजगार सेवक आणि दोन कर्मचाऱ्यांच्या मदतीने पाणवठ्यावर सिमेंट कॉंक्रिटीकरणाचे काम पूर्ण केले. त्यामुळे आता पाणवठ्यात दीर्घकाळ पाणी साठून राहणार आहे.

### ग्रामस्थ व दानशूरांची पुढाकार

सुपा येथील उद्योजक योगेश रोकडे हे गेल्या अनेक वर्षांपासून या वन्यजीवांना पाणी उपलब्ध करून देण्यासाठी पुढाकार घेत आहेत. तसेच सुपा परिसरातील अनेक दानशूर नागरिकांनी आपल्या प्रियजनांच्या स्मरणार्थ किंवा वाढदिवसानिमित्त जंगलातील पाणवठ्यात पाणी सोडण्याचा उपक्रम राबवला आहे. पर्यावरणप्रेमींनीही सुपा शहरासह पंचक्रोशीतील नागरिकांनी सामाजिक बांधिलकी जपत उन्हाळ्यात जंगलातील पाणवठ्यांमध्ये पाणी सोडून या मुक्या जीवांना दिलासा द्यावा, असे आवाहन केले आहे.

### वन्यजीवांना पाणी पाजा

शहाजापूरच्या जंगलात शेकडो वन्यप्राणी वास्तव्याला आहेत. उन्हाळ्यातील तीव्र उष्णतेमुळे या मुक्या जीवांसाठी पाण्याची मोठी अडचण निर्माण होते. त्यामुळे समाजाने सामाजिक बांधिलकी म्हणून जंगलातील पाणवठ्यांमध्ये पाणी सोडून या वन्यजीवांना मदत करावी. तसेच वन विभागानेही या पाणवठ्यात नियमित पाणी सोडण्याची व्यवस्था करावी. वनक्षेत्राची व्याप्ती आणि प्राण्यांची संख्या लक्षात घेता येथे आणखी दोन पाणवठे उभारावेत, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते सुरेंद्र शिंदे यांनी केली आहे.

# पळवे आरोग्य केंद्रात एचपीव्ही लसीकरण मोहिम

## १४ ते १५ वर्षांच्या मुलींना मोफत लस

सुपा : प्रतिनिधी

गर्भाशय मुखाचा कर्करोग टाळण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाय म्हणून पळवे येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात एचपीव्ही (ह्युमन पॅपिलोमा व्हायरस) लसीकरण मोहिमेला सुरुवात करण्यात आली आहे. या मोहिमेअंतर्गत १४ ते १५ वर्षे वयोगटातील मुलींना ही लस मोफत देण्यात येत असून ग्रामीण भागात जनजागृतीसह लसीकरणाचा उपक्रम राबविण्यात येत आहे.



### गर्भाशय कर्करोगाविरुद्ध संरक्षण

एचपीव्ही या विषाणूमुळे महिलांमध्ये गर्भाशय मुखाचा कर्करोग होण्याचा धोका वाढतो. योग्य वयात एचपीव्ही लस घेतल्यास या गंभीर आजाराचा धोका मोठ्या प्रमाणात कमी करता येतो. त्यामुळे आरोग्य विभागाकडून ग्रामीण भागात लसीकरणाबाबत जनजागृती करून मुलींना लस देण्यावर भर दिला जात आहे. या मोहिमेत १० मार्च २०११ ते १० जून २०१२ दरम्यान जन्मलेल्या १४ ते १५ वर्षे वयोगटातील मुलींना लस दिली जात आहे.

### पालकांनी पुढाकार घ्यावा

प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ. सुदाम बागल यांनी सांगितले की, महिलांमध्ये आढळणाऱ्या कर्करोगांपैकी गर्भाशय मुखाचा कर्करोग हा अत्यंत गंभीर आजार आहे. या आजारापासून बचाव करण्यासाठी योग्य वयात एचपीव्ही लस घेणे महत्त्वाचे आहे. शासनाकडून ही लस मोफत उपलब्ध करून देण्यात आली असून पालकांनी आपल्या मुलींना लस देण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

### ग्रामीण मुलींना होणार लाभ

या लसीकरण मोहिमेमुळे ग्रामीण भागातील मुलींना भविष्यातील गंभीर आजारापासून संरक्षण मिळणार असून आरोग्यदायी जीवनासाठी हा उपक्रम महत्त्वाचा ठरणार आहे. त्यामुळे पात्र मुलींनी या मोफत लसीकरणाचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. बापूसाहेब नागरगोजे व तालुका आरोग्य अधिकारी डॉ. प्रकाश कांबळे यांनी केले आहे.

# समर्थ गुरुकुलमध्ये 'समर्थ बालमहोत्सव जल्लोषात

## छोट्या कलाकारांनी रंगवला सांस्कृतिक सोहळा

कर्जुले हर्या : प्रतिनिधी

समर्थ रुरल एज्युकेशनल इन्स्टिट्यूट संचलित समर्थ गुरुकुल, बांगरवाडी (बेल्हे) येथे आयोजित 'समर्थ बालमहोत्सव २०२६' मोठ्या उत्साहात आणि आनंदी वातावरणात पार पडला. विद्यार्थ्यांच्या विविध सांस्कृतिक सादरीकरणांनी संपूर्ण परिसर आनंदमय झाला. या कार्यक्रमाला पालक, शिक्षक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती शिवरायांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून मान्यवरांच्या हस्ते करण्यात आली. या प्रसंगी संस्थेचे अध्यक्ष वसंतराव शेळके, उपाध्यक्ष माऊलीशेठ शेळके, सचिव विवेक शेळके, विश्वस्त वल्लभ शेळके, जिल्हा परिषद माजी सदस्या स्नेहलताई शेळके, संचालिका सारिका ताई शेळके, कॅम्पस डायरेक्टर राजीव सावंत तसेच विविध महाविद्यालयांचे प्राचार्य आणि अधिकारी उपस्थित होते.




### सर्वांगीण विकासासाठी उपक्रम महत्त्वाचा

यावेळी बोलताना स्नेहलताई शेळके म्हणाल्या की, विद्यार्थ्यांमधील सुप्त कलागुणांना वाव देण्यासाठी आणि त्यांचा सर्वांगीण विकास घडवण्यासाठी बालमहोत्सवासारखे उपक्रम अत्यंत उपयुक्त ठरतात. अशा कार्यक्रमांमधून विद्यार्थ्यांना शिक्षणासोबतच सांस्कृतिक, क्रीडा आणि कलात्मक क्षेत्रात स्वतःची प्रतिभा सादर करण्याची संधी मिळते.

### आत्मविश्वास व सर्जनशीलतेला चालना

कॅम्पस डायरेक्टर राजीव सावंत यांनी सांगितले की, बालमहोत्सवामुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढतो, संघभावना विकसित होते तसेच त्यांच्या सर्जनशीलतेला चालना मिळते. अशा कार्यक्रमांमधून विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासाला मोठी मदत होते.

### छोट्या कलाकारांची बहारदार सादरीकरणे

या बालमहोत्सवात विद्यार्थ्यांनी गायन, नृत्य, नाटिका आणि विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे बहारदार सादरीकरण करून उपस्थितांची मने जिंकली. छोट्या कलाकारांच्या आत्मविश्वासपूर्ण आणि आकर्षक सादरीकरणामुळे संपूर्ण परिसर टाळ्यांच्या कडकडाटाने दुमदुमून गेला. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देणारा हा कार्यक्रम ठरला.

### नियोजनबद्ध आयोजन

या कार्यक्रमाचे नियोजन प्राचार्य सतीश कुऱ्हे आणि क्रीडा संचालक हरिश्चंद्र नरसुडे यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक रामचंद्र मते यांनी केले तर वार्षिक अहवालाचे वाचन पर्यवेक्षक सखाराम मातेले यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शीतल पाडेकर, मनीषा शेळके, प्रीती जाधव तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाच्या शेवटी सर्व सहभागी विद्यार्थ्यांचे कौतुक करण्यात आले. उपस्थितांचे आभार मानून या उत्साही बालमहोत्सवाची सांगता करण्यात आली.

# सावित्रीबाई फुलेंच्या विचारांची अळकुटीत उजळणी

## अळकुटी महाविद्यालयात पुण्यतिथीनिमित्त विशेष व्याख्यान



अळकुटी : प्रतिनिधी

भारतातील महान समाजसुधारक, स्त्रीशिक्षणाच्या अग्रदूत आणि स्त्रीसमानतेच्या क्रांतिकारी विचारवंत सावित्रीबाई फुले या केवळ शिक्षिका नव्हत्या, तर त्या स्त्रीशिक्षण, सामाजिक न्याय आणि मानवतावादी विचारांचे तेजस्वी प्रतीक होत्या. ज्या काळात स्त्रियांना शिक्षणाचा अधिकार नव्हता आणि समाजात त्यांना दुय्यम स्थान दिले जात होते, त्या कठीण परिस्थितीतही त्यांनी शिक्षणाचा दीप प्रज्वलित केला. त्यामुळेच सावित्रीबाई फुले या स्त्री शिक्षणाच्या आद्य प्रणेत्या असल्याचे प्रतिपादन प्राचार्या डॉ. कुंदा कवडे यांनी केले.

प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अळकुटी येथे सावित्रीबाई फुले यांच्या पुण्यतिथीनिमित्त विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. कुंदा कवडे उपस्थित होत्या.

### प्राध्यापक व विद्यार्थ्यांची उपस्थिती

या कार्यक्रमास प्रा. अर्जुन चाटे, प्रा. विशाल रोकडे, गोरख घोलप, सूर्यमाला भोर, प्रा. शर्मिष्ठा बोरुडे, प्रा. संजय जाधव, प्रा. दशरथ पानमंद, प्रा. दत्तात्रय शेळके, प्रा. प्रियंका दिवटे, प्रा. सुनिता जाधव, प्रा. विनायक सोनवणे, प्रा. पोपट सुंबरे, प्रा. मच्छिन्द्र बेलोटे, प्रा. अमोल नालकर, प्रा. पूजा वैरागर, प्रा. पांडुरंग उघडे, प्रा. स्वाती फापाळे, प्रा. सुषमा करकंडे, प्रा. ऋषिकेश गिते, प्रा. अनुराधा गाढवे, डॉ. शांताबाई थोरात, प्रा. रावसाहेब झावरे, प्रा. संदीप गेटम, प्रा. राजाराम गोरडे तसेच सुनिता भालेराव, नितीन घोलप, छाया म्हस्के, विकास सोनवणे, राहुल बोरुडे, मनोहर कनिंगध्वज, सागर शितोळे आदी प्राध्यापक, प्राध्यापकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन सांस्कृतिक विभागप्रमुख प्रा. विशाल रोकडे यांनी केले, तर आभार प्रा. पोपट सुंबरे यांनी मानले.

### स्त्रीशिक्षणासाठी धैर्याने उभ्या सावित्रीबाई

डॉ. कवडे पुढे म्हणाल्या की, सावित्रीबाई फुले यांनी केवळ मुलींच्या शिक्षणासाठीच नव्हे तर समाजातील शोषित, वंचित आणि दलित घटकांच्या उन्नतीसाठीही मोलाचे कार्य केले. विधवांसाठी आश्रय, बालहत्या प्रतिबंधक केंद्र आणि अनाथ मुलांसाठी आश्रम उभारून त्यांनी समाजात मानवतेची आणि समानतेची ज्योत पेटवली.

### समाजपरिवर्तनासाठी शिक्षणाचे सामर्थ्य

सावित्रीबाई फुले यांचे जीवन संघर्ष, धैर्य आणि सेवाभावाचे प्रेरणादायी उदाहरण आहे. त्यांनी दाखवून दिले की शिक्षण हेच समाज परिवर्तनाचे सर्वात प्रभावी साधन आहे. त्यांच्या पुण्यतिथीनिमित्त त्यांच्या विचारांचा आदर्श जीवनात अंगीकारण्याचा संकल्प आपण केला पाहिजे, असेही त्या म्हणाल्या.

# शालेय शिक्षणच स्पर्धा परीक्षांच्या यशाचा पाया

## यूपीएससी उत्तीर्ण अल्पेश ढवळे यांचा कानमंत्र । पारनेर पब्लिक स्कूलमध्ये सत्कार

पारनेर : प्रतिनिधी

पारनेर येथील पारनेर पब्लिक स्कूल व ज्यु. कॉलेज ऑफ सायन्स येथे बुधवारी (दि.११) निघोज गावचे सुपुत्र आणि भाऊसाहेब ढवळे यांचे चिरंजीव अल्पेश अरुणा भाऊसाहेब ढवळे यांचा सत्कार समारंभ उत्साहात पार पडला. केंद्रीय लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात आलेल्या स्पर्धा परीक्षेत ऑल इंडिया रँक ६७८ मिळविल्याबद्दल त्यांचा गौरव करण्यात आला.

या वेळी विद्यार्थ्यांशी संवाद साधताना अल्पेश ढवळे यांनी शालेय शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित केले. ''स्पर्धा परीक्षांमध्ये यश मिळविण्याचा पाया शालेय जीवनातच तयार होत असतो. त्यामुळे शालेय शिक्षण अत्यंत काळजीपूर्वक आणि एकाग्रतेने घ्यावे,'' असे मार्गदर्शन त्यांनी विद्यार्थ्यांना केले.



### शालेय प्रवासातून यशाची वाटचाल

आपल्या यशाचा प्रवास सांगताना अल्पेश ढवळे यांनी शालेय जीवनातील अनुभव विद्यार्थ्यांशी शेअर केले. त्यांचे प्राथमिक शिक्षण निघोज येथील कुंडवस्ती येथे झाले, तर माध्यमिक शिक्षण मळगंगा विद्यालय, निघोज येथे पूर्ण झाले. अकरावी-बारावीचे शिक्षण शिरूर येथे घेतल्यानंतर त्यांनी पुणे येथे बी.एस्सी. (जीवशास्त्र) पदवी संपादन केली. त्यानंतर दिल्ली येथे केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षेची तयारी करत सहाव्या प्रयत्नात त्यांनी हे यश मिळविले.

### कुटुंबीयांचे मार्गदर्शन महत्त्वाचे

आपल्या यशामागे आई, मोठे बंधू आणि मामी यांचे मोलाचे मार्गदर्शन असल्याचे सांगत त्यांनी कुटुंबाच्या पाठबळाचे महत्त्व अधोरेखित केले. विद्यार्थ्यांनी विचारलेल्या विविध प्रश्नांची उत्तरे देत त्यांनी संवाद साधला. या कार्यक्रमास संस्थेच्या अध्यक्षा सविता म्हस्के, विद्यालयाचे प्राचार्य गिताराम म्हस्के, डॉ. अभिषेक गिताराम म्हस्के, पत्रकार विनोद गोळे, अल्पेश ढवळे यांच्या मातोश्री अरुणा ढवळे, मोठे बंधू अक्षय ढवळे, मामी जयश्री औटी यांच्यासह विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन सचिन मोढवे यांनी केले.

### अभ्यासासाठी वेळेचे नियोजन महत्त्वाचे

विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना त्यांनी अभ्यासासाठी वेळेचे नियोजन अत्यंत महत्त्वाचे असल्याचे सांगितले. शालेय जीवनातच एनसीईआरटीची पुस्तके वाचण्याची सवय लावावी, विविध शालेय उपक्रमांमध्ये सहभाग घ्यावा आणि दररोज वर्तमानपत्राचे नियमित वाचन करावे, असा सल्लाही त्यांनी दिला.

### मोबाईल मिळविण्यासाठी

आजच्या डिजिटल युगात मोबाईलचा वापर कसा करावा याबाबतही त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. मोबाईल हे दुधारी शस्त्र असून त्याचा वापर वेळ वाया घालविण्याऐवजी माहिती शोधण्यासाठी व ज्ञान वाढविण्यासाठी करावा, असे त्यांनी सांगितले. तसेच शिक्षकांचा आदर करणे आणि त्यांच्याकडून मिळणारे मार्गदर्शन आत्मसात करणे ही यशाची गुरुकिल्ली असल्याचेही त्यांनी नमूद केले.

# चोंभूतच्या रसिकांनी कलेवर उधळले प्रेम!

## पद्मश्री रघुवीर खेडकर भावुक । तीन दिवसीय ग्रामदैवतांच्या यात्रोत्सवात नामांकित तमाशा मंडळांची रंगत

चोंभूत : स्वप्नील भालेराव

तालुक्यातील चोंभूत येथे ग्रामदैवतांच्या तीन दिवसीय यात्रोत्सवाला यंदा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. श्री हनुमान, श्री कानिफनाथ आणि श्री मुक्ताई या ग्रामदैवतांच्या यात्रेनिमित्त आयोजित करण्यात आलेला हा उत्सव विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांनी रंगला. विशेष म्हणजे महाराष्ट्रातील नामांकित लोकनाट्य तमाशा मंडळांच्या सादरीकरणामुळे यात्रेला वेगळीच रंगत लाभली. तीन दिवस चाललेला हा यात्रोत्सव शांततेत आणि उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.



### नामांकित तमाशा मंडळांची सादरीकरणे

यात्रोत्सवात महाराष्ट्रातील प्रसिद्ध लोकनाट्य तमाशा मंडळांना आमंत्रित करण्यात आले होते. दि. ९ रोजी राष्ट्रपती पुरस्कार विजेत्या 'संगीताची राणी' मंगला बनसोडे यांच्यासह नितीनकुमार बनसोडे-करवडीकर यांच्या तमाशाचा कार्यक्रम झाला. तर दि. १० रोजी भारत सरकारकडून सन्मानित पद्मश्री पुरस्कार विजेते मास्टर रघुवीर खेडकर आणि कांताबाई सातारकर यांच्या तमाशाने प्रेक्षकांची मने जिंकली. गेल्या आठ वर्षांपासून ही दोन्ही नामांकित तमाशा मंडळे चोंभूत येथे आपली कला सादर करत आहेत. दरवर्षी उत्कृष्ट सादरीकरणामुळे हजारो प्रेक्षक उपस्थित राहतात आणि कोणताही अनुचित प्रकार न घडता कार्यक्रम पार पडतात, हे या यात्रेचे वैशिष्ट्य ठरले आहे.

### धार्मिक विधींसह सांस्कृतिक कार्यक्रम

यात्रोत्सवाच्या निमित्ताने गावात विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. ग्रामदैवतांच्या पूजा-अर्चा, पालखी सोहळे आणि पारंपरिक विधी यामध्ये ग्रामस्थांनी मोठ्या भक्तिभावाने सहभाग घेतला. या धार्मिक वातावरणात सांस्कृतिक कार्यक्रमांचीही मेजवानी देण्यात आली होती.

### चोंभूतने कलाकारांना दिला आधार

कोरोना संकटाच्या आधीपासून आम्ही चोंभूत येथे कलेची सेवा देत आहोत. कोरोना काळानंतर कलाकारांवर मोठे संकट आले होते. त्या कठीण काळात चोंभूत गावाने आम्हाला धीर दिला. पुढील वर्षासाठी सलग तारखा देऊन कलाकारांना मोठा आधार दिला.

नितीनकुमार बनसोडे-करवडीकर (तमाशा कलावंत)

### ग्रामस्थ व पोलिस प्रशासनाचे सहकार्य

यात्रोत्सव सुरळीत पार पडण्यासाठी समस्त चोंभूत ग्रामस्थांसह पारनेर पोलिस प्रशासनाने मोलाचे सहकार्य केले. कार्यक्रमादरम्यान शिस्तबद्ध व्यवस्था ठेवण्यात आली होती. त्यामुळे यात्रेचा आनंद भाविक व रसिकांना मनमुराद घेता आला.

### रसिक मायबापांच्या प्रेमामुळेच पद्मश्री

चोंभूत नगरीत गेली आठ वर्षे सलग येत आहे. कोरोना काळानंतर चोंभूतच्या रसिकांनी भरभरून प्रेम दिले. त्या काळात मी निवृत्त होण्याचा विचार केला होता; मात्र रसिक मायबापांच्या प्रेमाने मला पुन्हा उभारी मिळाली. कलेच्या सेवेबद्दल मिळालेला पद्मश्री पुरस्कारही या प्रेमामुळेच शक्य झाला. आता निवृत्त न होता पुढेही कला जोपासत रसिकांची सेवा करत राहणार आहे.

पद्मश्री रघुवीर खेडकर (लोककलावंत)

'पारनेर दर्शन' हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक देविदास रामभाऊ आबूज यांनी ओंकार ऑफसेट, कॉलेज रोड, पारनेर ४१४३०२ अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून 'पारनेर दर्शन' कार्यालय, कॉलेज रोड,पारनेर ४१४३०२,जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संपादक : देविदास रामभाऊ आबूज मोबा.९४२१४७८२८३ ई- मेल : deviabuj@gmail.com
'PARNER DARSHAN' Printer,Publisher And Ower By DEVIDAS RAMBHAU ABUJ Printed At OMKAR OFSSET Collage Road,PARNER-414302 Dist-Ahmednagar (M.S)
Editor-DEVIDAS RAMBHAU ABUJ ▪ Mob : 9421478283 ▪ Email : deviabuj@gmail.com